Rotary

Bulletin of

# Rotary Club of Pune Tilak Road

R. I. Dist. 3131 Club No. 26158

THE MAGIC OF ROTARY

# UPDATE

Issue : 3, 2024-25 | Thursday 18th July 2024

● **President :** Rtn. Parag Gadgil ● **Secretary :** Rtn. Devdatta Hambardikar ● **Director Admin. :** Rtn. Prasad Kumbhojkar
● **Editor :** Ann Chitra Bhave ● **Co-editor :** Ann Sulabha Sidhaye

## Today

**१८ जुलै :** Mrs. Meenal Dani who works as Counsellor & has done cultural research on Mental illness. Her Interview will be conducted. **Topic :** Domestic Violence and Mental Health.

## Looking Forward

**२५ जुलै :** "Half to Better Half"
You are going to share about your life partner!
**१ ऑगस्ट :** Sanitation and Protection of Environment
**Guest Speaker :** Mr. Rajiv Kher

## Looking Back

लेडीज मंथच्यामंथचा दुसरा म्हणजे दि.११ जुलैचा गुरुवार हा सौ. मीना कानडे यांच्या "रामायणातील ऋषिपत्नींचा सहभाग" या विषयावरील व्याख्यानाने रंगला. सौ. मीनाताई ह्या आपल्या मेंबर रो. शिल्पा गोरे यांच्या मातोश्री असून १९६७ पासून त्या राष्ट्र सेविका दलाच्या निष्ठावान कार्यकर्त्या आहेत. गेली २७ वर्षे त्या रामायण, आणि महाभारत यांवर विविध व्याख्यान देत आहेत. गुरुंना वंदन करुन त्यांनी कार्यक्रमाची सुरवात केली. रामायणाचा कालावधी हा १४२८४ वर्षांपूर्वीचा असल्याचे सांगत मीनाताई म्हणाल्या कि वाल्मिकीं ऋषींना रामायण लिहिण्याची प्रेरणा महर्षी नारदांकडून प्राप्त झाली. त्यांनीच त्यांना रामायण लिहिण्यास प्रवृत्त केले कारण त्यांना भविष्यात घडणाऱ्या घडामोडींची कल्पना होती. रामायणातील महत्वाच्या पात्रांपैकी एक पात्र आणि श्रीरामाच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणाऱ्या वशिष्ठ मुनींची जन्मकथा अतिशय रंजक आहे. राज्याला वारस हवा म्हणून उर्वशीच्या मागणीला होकार देऊन परंतु प्रत्यक्षात मात्र तिच्याशी संग न करणाऱ्या मित्रावरण राजाच्या एकपेशीय बीजापासून वशिष्ठ मुनींचा जन्म झाला असे पुराण सांगते. भविष्यातील रावण वधाची गरज जाणून जंगलातील रानटी व क्रूर लोकांचे गुण हेरुन तत्कालीन शक, हुण आणि कंबोज यांच्या मदतीने या लोकांची संघटना निर्माण करणे येथेच यातून वशिष्ठांचे संघटन कौशल्य व दूरदृष्टी दिसून येते. अशा वशिष्ठांची पत्नी, कश्यप ऋषींची कन्या म्हणजे अरुंधती. हुशार, कष्टाळू, चिकित्सकवृत्ती, स्पष्टवक्तेपणा, आणि विवेक असे अनेक गुण अंगी असल्यामुळे अरुंधतीचे सर्व ऋषिपत्नींच्यात वेगळे असे स्वतःचे स्थान होते. वशिष्ठांच्या अनुपस्थितीत अरुंधती त्यांच्या




आश्रमाचे सर्व कामकाज व, नियोजन उत्तमरीत्या पार पडत होती. तिने आश्रमातील इतर ऋषी, शिष्य या सर्वांची निर्मोहीपणाने सेवा केली. ती अत्यंत कर्तव्यपरायण पत्नी होती. म्हणूनच भर थंडीत, नदीवरुन पाणी आणण्याऐवजी नदीकिनारील अग्नीच्या उबेला बसणाऱ्या इतर ऋषिपत्नीं प्रमाणे अरुंधती तेथे थांबली नाही. तिने थंडीतही नदीवरून पाणी आणून आपली कर्तव्यतत्परता दाखवून दिली. तिच्या या गुणांमुळेच तिला आकाशातील सप्तर्षी समूहामध्ये विशेष स्थान प्राप्त झाले आहे. जे इतर कुठल्याही ऋषिपत्नीला मिळाले नाही. आकाशात सप्तर्षींचा जो तारका समूह दिसतो त्याच्या कडेला अंधुकसा एक तारा दिसतो तोच अरुंधतीचा तारा. हिंदू विवाह पद्धती नुसार विवाहासमयी पतीने पत्नीला अरुंधतीचा तारा दाखवायचा असतो आणि वशिष्ठ व अरुंधतीप्रमाणे त्यांचा संसार होवो अशी कामना नवदाम्पत्याने करायची असते असा विधी आहे. बऱ्याच लोकांना अरुंधती विषयी माहित नव्हते. मीनाताईंनी अतिशय प्रभावीपणे तिच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून दिली.

वशिष्ठांचेच बंधू असलेले अगस्ती ऋषी. त्यांचा जन्म कुंभात (ज्याला सध्याच्या भाषेत IVF म्हणता येईल) झाला असे पुराण सांगते. आपल्या बंधूंप्रमाणेच अगस्ती ऋषींनीही दंडकारण्यातील रानटी द्रविड लोकांचे संघटन केले. हे कां ? तर रावण वधासाठी या लोकांचे सहकार्य मिळावे म्हणून. खरंतर अगस्ती ऋषींना विवाहच करावयाचा नव्हता. परंतु भूतयोनीत गेलेल्या आपल्या पूर्वजांच्या मुक्तीसाठी त्यांना विवाह करणे

भाग पडले. पण येथेही त्यांची दूरदृष्टी दिसून येते. राजाश्रयाखेरीज कुठलेही लोकहित कार्य होणे शक्य नाही हे जाणून त्यांनी विदर्भ देशाची राजकन्या लोपामुद्रेशी विवाह केला. ती अतिशय सुंदर, हुशार, कुशल संभाषण चातुर्य असलेली व नृत्यनिपुण होती. राजास पसंत नसतानाही लोपामुद्रेने वेगळ्या वाटेने जाणाऱ्या अगस्तींशी विवाह केला व त्यांच्याच अटीनुसार आपले सर्व राजवैभव त्यागून ती पतीसह आश्रमात गेली. केवढा हा त्याग. अगस्तींच्या बरोबरीने ती द्रविड समूहासाठी काम करू लागली. द्रविड स्त्रियांना तिने प्रसूती व इतर स्त्रीधर्माची माहिती करुन दिली ज्यामुळे ती त्यांना आपलीशी वाटू लागली व त्या तिचे ऐकू लागल्या. हि कथाही मीनाताईंनी अतिशय रंजकतेने सांगितली. पाहायला गेलं तर अरुंधती आणि लोपामुद्रा दोघी अतिशय वेगळ्या कौटुंबिक पार्श्वभूमीतून आलेल्या. एक ऋषिकन्या तर एक दुसरी राजकन्या. पण दोघींच्यातले साम्य म्हणजे दोघींनींही आपापल्या पसंतीनेच वेगळ्या वाटेने जाणारे पती निवडले होते. त्यांच्या कार्यात या दोघींचाही समान सहभाग होता असे म्हटल्यास वावगे ठरू नये. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एक स्त्री असते हा वाक्प्रचार यांच्यामुळेच रूढ झाला असावा. मीनाताईंच्या व्याख्यानातून कळलेली आणखी एक गोष्ट म्हणजे वशिष्ठविशिष्ट आणि अगस्तींचा जन्म. आत्ताच्या गर्भधारणेच्या विविध पद्धतींचे मूळ तेव्हाच रुजले गेले असावे हे यावरुन लक्षात येते. वयाच्या ८२ व्या वर्षीही मीनाताईंची स्मरणशक्ती व उत्साह वाखाणण्याजोगा होता.. जवळपास सव्वा तास त्या पाण्याचा घोटही न घेता अखंड बोलत होत्या. त्यांचे बोलणे संपू नये असेच वाटत होते. आपल्याला या फारश्या प्रकाशझोतात नसलेल्या पात्रांचा विशेष परिचय करून दिल्याबद्दल प्रेसिडेंट पराग गाडगीळ यांनी भेटवस्तू देऊन मीनाताईंचा सत्कार केला. मीनाताईंची ओळख करून देण्याचे काम रो. ज्योती रानडे यांनी चोख बजावले तर आभार मानण्याची जबाबदारी रो. डॉ.मधुरा जोशी यांनी पार पाडली.

**- रो. डॉ. मधुरा जोशी**

## छत्रछाया प्रकल्प रिपोर्ट







दिनांक १६ जुलै रोजी दुपारी १२. ३० वाजता, अध्यक्ष पराग यांच्या लक्ष्मी रोड वरील, पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स या दुकानापासून, आपल्या "छत्रछाया" या प्रकल्पाची सुरवात झाली.

" छत्रछाया " हा आपल्या डिस्ट्रिक्टने विकसित केलेला एक छान प्रकल्प आहे, ज्यामुळे रोटरीची " पब्लिक इमेज " जनमानसात उत्तम प्रकारे होते आहे.

ऊन, वारा, पाऊस अशा अनेक नैसर्गिक अडचणींचा सामना करीत अनेक छोटे उद्योजक, आपले व्यवसाय वेगवेगळ्या रस्त्यांवर करीत असतात. घरगुती वापराच्या अनेक वस्तू, कृत्रिम दागिने, कलाकुसरीच्या वस्तू अशा अनेक गोष्टी ते विकत असतात. या मोठ्या आकाराच्या छत्र्यांमुळे याविक्रेत्यांचे नुकसान टळणार आहे. या छत्र्या मिळाल्यामुळे त्यांचे चेहरे आनंदाने आणि कृतज्ञतेने बहरलेले होते. आपल्या सर्व उपस्थितांना पण योग्य ठिकाणी मदत केल्याचे समाधान मिळाले.

आपण आपल्या क्लबतर्फे २० छत्र्यांचे वाटप केले. हे सर्व वेंडर्स नोंदणीकृत आहेत याची खात्री करून, अध्यक्ष पराग, सचिव देवदत्त आणि बोर्डाने त्यांची निवड केली होती.

या प्रकल्पाच्यावेळी अध्यक्ष पराग, फर्स्ट लेडी अंजली, सचिव देवदत्त, अँन डॉ. मंजिरी, पीपी रो. दादा, शामला, चारुदत्त, रो. स्वाती, मकरंद, प्रसाद असे सर्वजण उपस्थित होते.

**पीपी रो. शामला जोशी**

## Congratulations

Happy to share Good News : Our veteran member Rtn. Dr. Anant Sardeshmukh got first nominated and then elected as "EXECUTIVE COMMITTEE MEMBER OF MCCIA (Mahratta Chamber Of commerce, industries and Agricultural" for 2024-26. Congratulations Dr. Anant and with you a successful tenure as usual

## Club News

Rotary Youth Exchange

Ms. Julia Petra Klaussecker from Germany and Ms. Shibani Mengale will be visiting to our club on August 1, 2024. They are going to visit under Rotary Youth Exchange Program.

## *Many Happy Returns...*

**24 July : Rtn. Narendra Khedekar**

